महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# सविस्तर निविदा सुचना

खालील कामासाठी महापारेषण मधील नोंदणीकृत (Digitally signed) ठेकेदारांकडून तसेच पी.डब्ल्यु.डी. / एम.ई.एस. / रेल्वे / म. जीवन प्राधिकरण ई. सरकारी, निम सरकारी खात्यांमध्ये पंजीकृत अनुभवी ठेकेदारांकडून महापारेषणच्या एसआरएम-ईटेंडरींग पोर्टल द्वारे मागविण्यात येत आहे.

| निविदा क्रमांक | निविदा तपशील | कामाची अंदाजीत रक्कम / इसारा रक्कम रु. | कामाचा कालावधी / निविदा किंमत |
|---|---|---|---|
| टी-१० / २०१९-२० RFX No. 7000015127 | १३२ केव्ही नंदुरबार उपकेंद्र, जि. नंदुरबार येथील काटेरी तारेच्या कुंपणाचे दुरूस्तीचे काम करणे | ९,६४,९१०.०० / ९,६४९.१० | २ महिने / रु.५००+ रू. २५ (जी.एस.टी.) |

(वरील सर्व कामांच्या अंदाजित रकमेमध्ये १८.००% G.S.T. अंतर्भुत आहे)

निविदा पात्रतेसाठी सादर करावयाचे अत्यावश्यक प्राथमिक कागदपत्रे :-

१. योग्य श्रेणीत स्थापत्य बांधकाम विषयक पंजीकृत असल्याचे वैध प्रमाणपत्र. २. G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र व क्रमांक ३. Latest Statement of Net worth for an amount equal to 25% of the estimated cost of work duly certified by Chartered Accountant. Latest = Latest year ending 31st March. ४. वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र **(Annual Turn-over Certificate)** : ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या मागील तीन वर्षाची सरासरी उलाढाल निविदेमधील कामाच्या अंदाजित रकमेच्या कमीत कमी ३०% ऐवढी असावी. वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र / नफा-तोटा पत्रक मागील तिन वर्षाचे सनदी लेखापाल किंवा तत्सम द्वारे प्रमाणित केलेले असावे. ५) अनुभव प्रमाणपत्र **(Experience Certificate)** : सरकारी किंवा खाजगी संस्थेमध्ये स्थापत्य कामे केल्याचे अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. तथापी सरकारी प्रमाणपत्र कमीतकमी कार्यकारी अभियंता द्वारे प्रमाणित केलेले असावे. खाजगी संस्थेतील अनुभव प्रमाणपत्र सनदी अभियंता / वास्तुविशारद यांचेकडून प्रमाणित व त्यांच्या सही शिक्क्यासह व नोंदणीक्रमांकासह तसेच त्या कामाच्या करारपत्रकाच्या प्रमाणित प्रतीसह खालील दर्शविल्याप्रमाणे सादर करावे लागतील. सदरची कामाची निविदा आमंत्रीत केल्याच्या मागील महिन्याच्या सात वर्षाच्या कालावधीच्या आंत खालील प्रमाणे कामे यशस्वीरित्या पुर्ण केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र कोणतेही एक सादर करावे लागतील. (i) निविदेतील कामाच्या अंदाजित रकमेच्या ४०% एवढ्या किंमतीचे तीन कामे पूर्ण केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र किंवा (ii) निविदेतील कामाच्या अंदाजित रकमेच्या ५०% एवढ्या किंमतीचे दोन कामे पूर्ण केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र किंवा (iii) निविदेतील कामाच्या अंदाजित रकमेच्या ८०% एवढ्या किंमतीचे एक काम पूर्ण केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र. ६. भविष्य निर्वाह नियमाखाली नोंदणी पंजीकृत असल्याचे प्रमाणपत्र. ७. इसारा रक्कम ऑनलाईन भरल्याचा पुरावा (बँक ट्रॅन्झॅक्शन स्लीप प्रिंटआऊट ची झेरॉक्स). निविदाकाराने निविदा भरतांना सर्व करांचा बोजा विचारात घेऊन किंमत बोली (Price Bid) भरावी.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी ट्रान्समिशन कंपनी लि. च्या वेब साईट वरील SRM - e - Tendering Portal वरून सदर कामाच्या निविदा दि. ०३/०२/२०२० पासून डाऊनलोड करून घेता येतील. तसेच त्या निविदा दि. ११/०२/२०२० -रात्री २३.५९ पर्यंत संपूर्ण कागदपत्रांसह ऑनलाईन सादर कराव्या लागतील.

निविदा सादर करतांना निविदा शुल्क (ना परतावा रक्कम) व इसारा रक्कम ऑनलाईन (नेट बँकींग, क्रेडीट कार्ड द्वारे) भरणे अनिवार्य आहे. निविदा शुल्क (ना परतावा रक्कम) व इसारा रक्कम रोखीने किंवा डीमांड ड्राफ्ट द्वारे स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी ट्रान्समिशन कंपनी लि. च्या वेब साईट वरील SRM - e - Tendering Portal वर निविदा सादर करण्याची अंतीम दि. ११/०२/२०२०- रात्री २३.५९ पर्यंत असून प्राप्त निविदा दि. १२/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहू इच्छिणाऱ्या निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष कार्यकारी अभियंता (स्थापत्य) अऊदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभाग, १३२ केव्ही उपकेंद्र परिसर, जुनी औद्योगिक वसाहत, अजिंठा रोड, जळगांव - ४२५००३ यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

कामाचे निविदा शुल्क व इसारा रक्कम वर नमुद केल्या प्रमाणे भरणा न केल्यास निविदा फेटाळण्यात येतील.

विशेष सुचना :- १) निविदेतील अटी व दर हे निविदा उघडल्याच्या तारखे पासून १२० दिवसांपर्यंत बंधनकारक राहतील. (Validity of Tender) २) अटीच्या / पर्यायी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

कोणतेही कारण न दर्शविता कोणती ही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी ट्रान्समिशन कंपनी लि. च्या सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) जळगांव

13 FEB 2020

Executive Engineer (Civil)
E.H.V.,C.C.C.M. Dn.
M.S.E.T.C.L.,JALGAON